# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/11/2022 (गुरूवार) दुपार

---

## घरफोडी

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत नविन वस्ती खापा येथे दिनांक ०९/११/२०२२ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मोरेश्वर उकंडराव अंतूरकर, वय ४७ वर्ष, रा. नविन वस्ती, खापा हे घराच्या दाराला कूलुप लावून गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्याचे घरातील समोरील दवाजाचे कूलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी आलमारी उघडुन त्यातील सोन्याची ०१ तोळा वजनाची पोत पदक मणी असलेली किंमती अंदाजे ३५,०००/—रू., सोन्याची ३.५ ग्रॅम वजनाची कानातील टॉप्स किमती अंदाजे ९५००/— रू., ०१ ग्रॅमचे सोन्याची नथनी किमंती अंदाजे ३०००/— रू., ०७ तोळे चांदीच्या पायपट्टया किमंती अंदाजे ५०००/— रू., ०३ ग्रॅम वजनाचे चांदीचे जोडवे किंमती अंदाजे २५००/— रू., चांदीचा आकडा ०३ ग्रॅम किंमती अंदाजे २५००/— रू., ५००/— रूपयाच्या नोटा असे नगदी ७०००/— रू. असा एकुण किंमती ६४,५००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बसस्टॉप मौदा येथे दिनांक ०९/११/२०२२ चे १६.४० वा. ते १६.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. आचल आशिष बालपांडे, वय २६ रा., जवाहरनगर ही नरेंन्द्र महाराजांच्या पादुका चरणस्पर्श दर्शनाला आली होती व ४.४५ वा. सुमारास आपल्या गावी जाण्याकरीता मौदा बसस्टॉप येथे बसची वाट पाहत होती बस आल्यावर बसमध्ये चढली असता फिर्यादीचे लक्ष तिच्या गळयाकडे गेले असता ०२ तोळयाचे मंगळसुत्र किंमती अंदाजे ४०,०००/— कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**